ग्रामपंचायत अधिकारी या संवर्गातील
अस्थायी कर्मचा-यांना स्थायित्व प्रमाणपत्र
उपलब्ध करुन देणे बाबत

जिल्हा परिषद अहिल्यानगर
सामान्य प्रशासन विभाग २
साप्रवि-२/ग्रापं-१/१५४/२०२५
दिनांक २१/०४/२०२५

वाचा :- १. महारष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील निर्णय क्र. एसआरव्ही/१०७५/१० दिनांक १९/९/१९७५
२. शासन सामान्य प्रशासन विभागाकडील परिपत्रक क्र स्थाप्रप-१४१४/ (प्र.क्र. ७३/१४)/ १३-अ दि.११ सप्टेबर २०१४.
३. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडील अधिकारी प्रदान आदेश क्रं साप्रवि-१/ र.व.का/०३१६/६२९/२०२२ दि.१२.१०.२०२२
४.गटविकास अधिकारी पं.स.पारनेर यांचेकडील प्रस्ताव जा.क्र.वशि/ग्राप/आस्था-२/ ३११/२०२५ दि.१९/०३/२०२५ व आस्था २/३१३/२०२५ दि.१९/०३/२०२५

महाराष्ट्र शासनाचे संदर्भीय निर्णयात / परिपत्रकात नमुद केलेनुसार प्रत्येक अस्थायी शासकीय कर्मचाऱ्यास/अधिका-यास स्थायित्व प्रमाणपत्र प्रथम पदावरील नियुक्तीच्या संदर्भात देणे आवश्यक आहे. त्यामुळे उपरोक्त संदर्भाधीन शासन निर्णय/परिपत्रके अधिक्रमित करुन त्यामधील सुचनांचा एकत्रित विचार करुन स्थायित्व प्रमाणपत्र देण्यासंदर्भात पुढील सुचना दिलेल्या आहेत.

प्रथम नियुक्तीच्या पदावर ३ वर्षाची नियमित सेवा पूर्ण करणाऱ्याव पुढील शर्तीची पूर्तता करीत असलेल्या अस्थायी शासकीय कर्मचा-यांना स्थायित्व प्रमाणपत्र देणे आवश्यक आहे त्यानुसार जिल्हा परिषदे अंतर्गत गट क व गट ड मधील पात्र अस्थायी कर्मचा-यांच्या बाबतीत संबधीत कार्यालय प्रमुखाने स्थायित्व प्रमाणपत्र देणे आवश्यक आहे. त्याबाबत खालील अटी व शर्ती बंधनकारक राहतील.

१. कर्मचाऱ्याची नियुक्ती सेवा प्रवेश नियमानुसार व विहित पध्दतीने होणे.
२.कर्मचारी सेवेस पात्र असल्याबाबतचे वैद्यकिय प्रमाणपत्र असणे व कर्मचाऱ्याने सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परिक्षा उत्तीर्ण होणे.
३. कर्मचाऱ्याचा सेवाभिलेख (उदा. गोपीनीय अहवाल, उपस्थिती, सचोटी इ.) चांगला असणे.

<u>स्थायित्व प्रमाणपत्राचा नमुना</u>

याद्वारे प्रमाणित करण्यात येते की उक्त महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील परिपत्रक दि.११ सप्टेंबर २०१४ मधील सुचना क्र.२ येथे विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या सर्व शर्ती खाली नमुद करण्यात आलेल्या अस्थायी शासकीय कर्मचाऱ्यांच्या बाबतीत पूर्ण झालेल्या आहेत आणि त्यानुसार ते कर्मचारी आवश्यक त्या सर्व प्रयोजनार्थ स्थायी शासकीय कर्मचारी म्हणुन समजले जाण्यास पात्र आहे

| अ क्र | शासकीय कर्मचा-यांचे नांव | कर्मचारी यांचे सध्याचे पदनाम व कार्यालय | ज्या पदावर स्तंभ क्र १ मधील कर्मचाऱ्यास स्थायित्व प्रमाणपत्र देण्यात येते त्या पदाचे पदनाम | कोणत्या दिनांकापासून स्थायित्व प्रमाणपत्र देण्यात आले. |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ३ | ४ |
| १ | श्री. नंदराम ज्ञानदेव कोतकर | ग्रामपंचायत अधिकारी, पं.स.पारनेर | ग्रामसेवक | १८.०२.२०२४ |
| २ | श्री.रामदास उमराव सांगळे | ग्रामपंचायत अधिकारी, पं.स.पारनेर | ग्रामसेवक | १८.०२.२०२४ |

वरील प्रमाणे कर्मचाऱ्यांना पुर्वीच्या पदावर ३ वर्षाची नियमीत सेवा पुर्ण करणाऱ्या पात्र अस्थायी कर्मचाऱ्यास व वर नमुद केलेल्या अटी पूर्ण करणाऱ्या कर्मचाऱ्यास संदर्भ क्र.३ नुसार मला दिलेल्या अधिकारानुसार स्थायित्वाचे प्रमाणपत्र देणेत येत आहे. सदर प्रमाणपत्राची संबंधीत कर्मचाऱ्याचे मुळ सेवा पुस्तकात नोंद घेणेपुर्वी उक्त अटी व शर्तीची पुर्तता संबंधीत कर्मचारी करीत असल्याबाबतची शहानिशा कार्यालय प्रमुख यांनी संबंधीत कर्मचा-यांचे मुळ सेवा पुस्तकावरुन करुन घेणेत यावी व त्यानंतरच सदर प्रमाणपत्राची नोंद घेणेत यावी. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल इकडे सादर करावा.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. 202504210600046 असा आहे.

Signed by
Shelke Rahul Ashok
Date: 21-04-2025 12:03:36
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रापं)
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति, श्री. नंदराम ज्ञानदेव कोतकर, ग्रामपंचायत अधिकारी,पं.स.पारनेर
श्री.रामदास उमराव सांगळे, ग्रामपंचायत अधिकारी,पं.स.पारनेर
द्वारा - गटविकास अधिकारी,पंचायत समिती पारनेर
प्रत - गटविकास अधिकारी, पंचायत समिती पारनेर, जि. अहिल्यानगर
प्रत - मुख्य लेखा व वित्त अधिकारी जि प अहिल्यानगर.